# महात्मा गांधी

# यांचा

# पोवाडा

: १८ :

सत्याची ढाल अहिंसेची घेऊन समशेर। विश्वाला धडे देण्याला
झाला तयार। हा कोण भरतभूमिचा पुत्र तेजाळ। साधुसंत राजकारणी
अग्रणीं जनीं, महात्मा वीर ॥ ध्रु० ॥

● ●

## प्रास्ताविक

मूर्ति बावळी, तनू हडकुळी, मांस मुळीं नच अंगाला। चमक परी
डोळ्यांत विलक्षण थक्क करी हा जगताला ॥ पहा ! पहा ! हा कोण
चालला थुंकुनिया स्वार्थावरती । जिंकुनी कामक्रोधवासना । कुठे
चालला दौड गती ॥ एक उपरणं दुसरा पंचा–दोनच वस्त्रं ज्या पुरती
उजव्या हातीं काठी लाकडी-झरझर चाले शीघ्र गती ॥ अज्ञसूज्ञही
बांधव सारे देवासम ज्याला भजती। असा महात्मा कोण जाहला ? लोक
जयाला हो नमती ॥ चरित्र त्याचें गाइन आतां श्रवण कराया तुम्हि
जमला। काव्यसुंदरी ! येइ झडकरी प्रसन्न कर जनमेळ्याला ॥

● ●

## चौक १ ला

बाळ अठरा वर्षांचा झाला। बॅरिस्टरची परीक्षा द्यायला। मोहनदास
चालला विलायतेला। तंवा माताजी बोलल्या लेकाला ! “ बाळ
शिकायला जा विलायतेला। पण एकच सांगतें मी तुला। ऐक मा



शब्द या वेळा। मदिराक्षी मांस मदिरेचा विटाळ जर झाला। तर
तुझी आई देइल जीवाला। असं सांगतात लोक रे मला। कीं जो जो
जातो इथनं विलायतेला। तो तो विलायती होऊनच आला। आईबाप
ठेवतो बाजूला। गोऱ्या बायका आणतो घराला। दारुचा घोट हवा
त्याला। मांसाचं खाणं रोज लागतं तसल्या माणसाला ॥ म्हणून सांगितलं
एवढं मीं तुला ” ॥ चाल ॥ आईचे शब्द ऐकून। पाण्यानं भरले नयन।
काळाजाचं पाणी होऊन। डोळ्यावाटें चाललं वाहून ॥ आईचं दुःख
पाहून। मोहनदास झाला बहु खिन्न ॥ मातेला बोलला नमून। डोकं
पायांवरी ठेवून ॥ घसा त्याचा आला भरून। बाळ बोलला दीन
होऊन ॥ “ आई, देतों तुला वचन। दूर राहिन त्यांच्यापासून ॥ चाल ॥
मदिराक्षी गोऱ्या ग स्त्रिया तुझ्यासम मला ॥ मदिरेचा घोट विषासारखा
माझ्या जीवाला। मांसाचा मोह पडणार नाहीं ग मला ॥ असं राखिन
माझ्या शीलाला ॥ अभ्यास पुरा करून येईन देशाला ॥ दे निरोप आई
ग मला ”। असं मोहनदास बोलला। आईनं निरोप त्याला दिला ॥
गंधाचा टिळा डोक्याला। अक्षता लावल्या कपाळाला। साइसकट दही
आइनं दिलं बाळाला ॥ मग गेला बाळ विलायतेला। व्हिक्टोरिया
हॉटेलांत उतरला। तिथं काय प्रकार झाला। तें सांगिन पुढच्या
चौकाला ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

आंग्ल तरुण-तरुणींचा जमला मेळावा त्या रात्रीला। झकपक पोषाख
तसाच ‘ मेकअप ’ करुनि सज्ज तो नाचाला ॥ आरसे बिलोरी चारी
भिंतीला जमीन झाली स्फटिकाची। नाचांतुन जे भाव प्रकटती चित्रं
दाविती ते त्यांची। मदिरा पिउनी, भान विसरुनि नाच चालला हो!
जेव्हां। मोहनदासाला स्वस्थ पाहुनी सर्व हासती त्या तेव्हां ॥ गोरा

जंटलमन हांसता हांसता बोलला मोहनदासाला । "कोण तूं ? इंडियन ? कशास आलास ? पोशाख जंगली का केला ?॥ हाकलुन द्या या काळ्या आदमीला 'ब्लडी फूल' रे हा झाला । नाच, गाणं काय येतयं तुजला ! कशाला आलास जन्माला " ॥चाल॥ मोहनदास गोंधळून गेला । अन् लागला विचार करायला ॥ 'एकदोन दिवसांतच आलों घाईला । जीवाचा कंटाळा आला । तर दोन तीन वर्षं काढुं कशीं बोला ?' । इतक्यांत विवेक त्याला बोलला । "हां वेडया ! असल्या गोष्टींत का आला जिवाचा कंटाळा तुला ? । पचवावं वीष तंवा घ्यावं शिवपदाला " । मोहनदास बोलला आपणाला । 'इथं राहून भागायचं नाहीं मला ' । असं म्हणुन गेला रिचमंडला । तिथं त्याचा एक मित्र होता त्याच्याकडं गेला । मित्राला जाऊन बोलला । कीं, "इथं रहायचं कसं शिकव मला । कीं ज्यामुळें सूख होईल जीवाला " । तंवा मित्र त्याला बोलला । "मोहनदास ! ऐक सांगतों तुला । मी सांगतों तसं जर करशील-वागशील-तर गोरे लोक झेलतील रे तुला ॥ चाल ॥ कर सर्ज फ्लॅनेलचा कोट । विलायती बूट । दारुचा घोट । घेउनी गोड ॥ मांसाचा घास घे गडया लाज ती सोड । गोड गोड गोऱ्या मैत्रिणी । गोड साजणी । नखरा करूनी । येतील जेव्हां । नाचावं त्यांना भेटून हौंसेनं तेव्हां ॥ चाल ॥ कर सूटबूटाचा थाट । इंग्रजांचा हो गड्या भाट ॥ चाल ॥ व्हायोलिनच्या गती दोन चार येऊं देत तुला ॥ मग होशील जंटलमन पुरा । कर जरा पैशाचा चुरा । वडिलांचा पैसा, त्याची काळजी कशाला तुला ?॥ धिक्कार हिंदी लोकाला । म्हण मूर्खं आपल्या लोकाला । दे शिव्या आईबापाला । मूठमाती देवा-धर्माला । म्हणें इंग्रज देव आम्हांला । मग होशील जंटलमन खरा । देतील मान मग तुला " । असं बोलणं ऐकलं-पण गांधी गुदमरून गेला । जसं कढतं तेल कानाला । मित्राचे बोल ते तसे मोहनदासाला ।



मग बोलला आपल्या मित्राला । "काय निंदूं आपलं आपणाला ? । अन् शिव्या देऊं आईबापाला ? । हें जमणार नाहीं मला । बरं व्हायोलिन तेवढं शिकव मला । तेवढंच आधीं जमतंय का पाहतो या वेळा । " एक व्हायोलिन आणलं त्या वेळा । अन् गांधींना पहिला धडा दिला । पण दोन महिने पहिलाच धडा चालला !! । तंवा कंटाळून सोडलं नादाला । मग भगवद्गीतेचा नाद लागला । तंवा मनाला पडला विरंगुळा । असो-**इनरटेंपलमध्यें** गेला शिकायला । तीन वर्षं अभ्यास केला । बॅरिस्टर झाला, आनंद झाला । परत आला हिंदुस्थानला । मानसन्मान मित्रांनीं केला । मोठे मोठे हार गळ्याला । तंवा मोहनदास बोलले लोकाला । "राजकोटला घेऊन चला मला । आईचा ध्यास लागलाय जीवाला । आईला सांगायचंय मला । कीं, शपथेत्नं पार मी झालों-आई या वेळा " ॥ तंवा थोरले भाऊ बोलले त्याला । कीं, 'मातोश्री गेल्या स्वर्गाला ' । तो चटका बसला जीवाला । कोमेजलं चित्त बाळाचं हर्ष मावळला ॥ थोडा वेळ सुचेना कांहीं त्याला । काळीज अश्रुरूपानं लागलं वाहायला ॥ असो-पुढें विवेक केला ॥ पुढचं सारं सांगिन आतां पुढच्या चौकाला ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

बॅरिस्टरचा धंदा करायला चालला आफ्रिकेला । मुहूर्त पाहून बॅरिस्टर हा बोटीवर चढला ॥ जलनौकेचा सात दिनांचा प्रवास तो सरला । आठव्या दिवशीच्या संध्याकाळीं प्रकार काय झाला ॥ वादळ झालें पाणी उसळलें दरिया खळवळला । उंच उंचशा लाटा देती धडक्या गगनाला ॥ जलनौकेला उंच उडविती लाटा त्या काळा । रूप भयानक घेऊन सागर भिववी बोटीला ॥ अफाट दर्या त्यांत बोट ती ठिपका जणुं काळा । लाटेसरशी उंच उडवितो भीषण हा चाळा ॥

जलनौका ती सावध भारी भीति न मुळिं तिजला । लाटेवरती करुनि चढाई राखी जीवाला ॥ भवसागर हा सुखदुःखाच्या लाटा सळसळती । जीवित नौका कशी हांकावी-जणु दाखवि जगतीं ॥ खेळ पाहुनी जलनौकेचा त्या संध्याकाळीं । अस्त जाहला गगनमणीचा, रजनी मग आली ॥चाल॥ झोंप लागली मोहनदासाला । एक स्वप्न पडलं मग त्याला । काय ऐका सांगतों तुम्हांला । किर्रर झाडी चारी बाजुला । रात्रींचा काळ तो झाला । सोसाट्याचा वारा वेगानं चालला झरझरा ॥ मोहनदास चालला सरसरा । पहाटेचा सुमार झाला । जंवा जंगलाच्या बाहेर पडला । तंवा दोन रस्ते दिसले डोळ्याला । कुठं जायचं समजेना त्याला । एक रस्ता गुलाबांनीं फुलला दोन्ही बाजुला ॥ मखमली गाद्यांनीं रस्ता होता झाकलेला ॥ नभिं चंद्र होता फुललेला । फळं, पुष्पं, जागोजागेला । थंडगार पाणी घेऊन प्रवाह चालला ॥ तीन मैल सारखा देखावा दिसला डोळ्याला । मग एक पर्वत आला । हिरेमाणकं वरच्या बाजूला । त्यांचा एक तलाव बांधला । पण पाणी होतं विषारी-यमदूत करति पहाऱ्याला ॥ मग दुसऱ्या रस्त्याकडं गेला । तो काट्यांनीं होता भरलेला । खाचखळगे जागोजागेला । नभिं सूर्य होता जळणारा । मधें जर तहान लागली कोणाला । तर पाण्याचा थेंबही दिसणार नाहीं डोळ्याला । एक झाड नाहीं विसाव्याला । वारा मुळीं नाहिं सेवेला । उकाड्यानं जीव गुदमरला । सात मैल रस्ता चालला । मग एक पर्वत दिसला डोळ्याला । स्फटिकांचा तलाव एक होता वरच्या बाजुला ॥ त्यांत राजहंस पक्ष्यांचा मेळा । अमृताचा तलाव तो झाला । मोहनदास कांठावर बसला। इतक्यांत बोटीचा कर्णा वाजला । अन् मोहनदास जागा झाला । **आफ्रिकेचा** किनारा लागला । किनाऱ्यावर पाय ठेवला । तों तें स्वप्न दिसलं डोळ्याला। आफ्रिकेंत प्रकार काय झाला । तें सांगिन पुढच्या चौकाला ॥ ३ ॥

● ●



## चौक ४ था

धापा टाकित इंजिन आलं स्टेशनाला। दहा डबे जोडले होते त्याला। मोहनदास फर्स्टक्लासांत जाऊन बसला । इतक्यांत प्रकार काय झाला। तिथं एक गोरा उतारूं आला । तो झटकन् आंत शिरला अन् ‘ जागा खाली कर ’ असं गांधींना बोलला । मोहनदास करती विचाराला । तें स्वप्न दिसलं डोळ्याला । गोऱ्यानं ठोसा देऊन काढलं बाहेर त्याला । मोहनदास बोलले गार्डाला । ‘ माझं तिकिट फर्स्टक्लासचं आहे तर खालीं कां काढलंस मला ? ’ । पण गार्ड बोलला । ‘ गोऱ्याला जागा दिली पाहिजे मला ॥ अन् तूं जा पुढच्या गाडीला ’ । स्वप्नाचा देखावा पुन्हा दिसला डोळ्याला ॥ स्टेजकोचच्या गाडींतुन लोटलं बाहेर एकदां त्याला ॥ पुढें **जोहान्सबर्गला** गेला । तिथं हॉटेलांत मनाई गांधीला । काळा आदमी गांधी म्हणून अपमान झाला ?। खिन्नता आली चित्ताला । **प्रे. क्रूगरच्या** घरासमोर आला । तिथं चालायची बंदी गांधींना केली त्यावेळा ॥ तंवा पुन्हा स्वप्नाचा देखावा दिसला डोळ्याला । अमृताच्या तलावावर होता दिवा लावलेला । इन्नर व्हॉईस ( Inner Voice ) म्हणति हो त्याला । ‘ आंतला आवाज ’ म्हणति हो त्याला । त्यानं केली प्रेरणा गांधींना । कीं फूटपाथ सोडूं नको या वेळा । गांधींनीं सत्याग्रह केला । फूटपाथवरनं लागले चालायला । तों इतक्यांत पहारेकरी आला । अन् गांधींना बोलला । ‘ ए काला आदमी ! चल जाव इधरसे ’ । गांधी बसले त्याच जागेला । तों पहारेवाल्यानं पाय उगारला । लाथेनं मारलं गांधीला । अन् भिरकावुन दिलं दूर त्याला । गांधींनीं डोळा झांकला। तों प्रल्हाद दिसला डोळ्याला। डोळा उघडला । तों दुसरी लाथ फाडकन् बसली डोक्याला । पुन्हा डोळा झाकला । तों ध्रुवबाळ दिसला डोळ्याला । गांधींनीं नमस्कार केला । मग गांधीजी सनद काढायला गेले कोर्टाला ॥ पण गोऱ्या बॅरिस्टरांनीं गिल्ला केला कीं ‘सनद देऊं नये काळ्या आदमीला !!’। १८९७

सालाला । गांधीजी गेले दर्बानला । पण गोरे लोक उतरूं देईनात त्याला। २४ दिवस बोटीचा कोंडमारा । एके दिवशीं गांधी उतरले दरबानला। तिथ्नं गेले अलेक्झांड्रा चौकाला । तों गोऱ्यांचा जमाव झाला गोळा । अन् त्यांनीं केला दगडांचा मारा । गांधींच्या अंगात्नं चालल्या रक्ताच्या धारा। पण हांसत हांसत चालले त्या वेळा । हिंदी मजुरांच्या केलं सेवेला। म्हणून त्यांचा आवडता झाला । पण हें रुचेना गोऱ्याला । म्हणुन असा त्यांचा छळ केला। पुढं बोअर युद्धाचा वणवा भडकला । त्यानं केली मदत इंग्रजाला। वैऱ्याला मदत करणारा। गांधीविना कोणीहि न झाला। सुखदुःख सारखं जीवाला । शत्रुमित्र सारखेच त्याला । कोण वंदणार नाहीं त्याला ? । लोकांनीं महात्मापदीं स्थापिलं त्याला ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

तुरुंगवास तीनदां भोगून । झगडा ल्ढवून, विजयी होऊन । आले गांधीजी भरतभूमीला ॥ १९१५ सालाला। जानेवारीच्या नवव्या तारखेला। कीर्तीच्या माळा चढवून आले देशाला ॥ लोकमान्य टिळक तो तिलक आर्यभूमीचा । गांधीजी फुलांचा हार जसा चमेलीचा। हिंदमाता शोभूं लागली । पुत्रांची जोडी ही भली । दिगंतरीं नेलं कीर्तीला । माथा उजळला । जोर पुण्याचा ॥ काळाला सांगा कोणाचा येइल कळवळा। त्यानं नेलं लोकमान्याला ।तंवा कोण हिंदमातेला धीर देणारा ॥ गांधीजी बोलले आईला । “ आई, शोक आवर या वेळेला । मी हजर तुझ्या सेवेला ”। सर्वस्वाचा होम केला। आश्रम एक काढला साबरमतीला । तिथ्नं हाल्तीं सूत्रं गरागरा ॥ चाल ॥ रौलेट ॲक्ट जुलमी लोकाला। जालियन-वाला बागेचा इतिहास ठाउक तुम्हाला । त्याचा प्रतिकार करण्याला । असहकारिता आली जन्माला। १९२१ सालाला। हज्जारो लोक तुरुंगाला । विद्यार्थी शाळा कॉलेज सोडुन बाहेर आला । वकिलांनीं सोडलं वकिलीला। प्रोफेसर सोडती नोकरीला। लाखो लोकांनीं आत्मयज्ञ केला। देशभर वणवा पेटला। तंवा १९२२ सालाला।



सरकारनं पकडलं गांधींना। **अन् सहा** वर्षं धाडलं तुरुंगाला । पण ईश्वरी योगायोग भला । अन् दोन वर्सांतच सोडलं वीराला । पुढं १९३० सालाला । कायदेभंगाचा लढा सुरू केला । ‘ दांडी मार्च ’ झाला । देश सारा खडबडून गेला। सरकारचं स्वास्थ्य विलयाला गेलं ते वेळा॥ लाखो लोक गेले तुरुंगाला । पुन्हां गांधीजींना नेलं येरोड्याला । तिथं स्वप्न पडलं गांधींना एका रात्रीला ॥ तें आतां सांगतों तुम्हाला । गांधीजी करति भजनाला । इतक्यांत प्रकार काय झाला । **काम** येऊन पुढं उभा राहिला । गांधिजींनीं हाकलिलं त्याला । मग दुसरा प्राणी आला । शस्त्रास्त्र त्याच्या हाताला। डोळा लालेलाल होता झाला । **क्रोध** म्हणति लोक त्याला । गांधीजींनीं दुरूनच नमस्कार केला । पुढं **लोभ** आला । मग **मोह-मद-मत्सर** एका मागून एक हे आले त्याच जागेला ॥ पण कोणालाही थारा नाहीं दिला । मग साधुसंत आले जागेला ॥ चाल ॥ **मिराबाई, सूरदास, नरसीमेहता** आणि **कबीर**, दिसले डोळ्याला ॥ **दधीची** दिसले डोळ्याला । तंवा गांधीजी ताडकन् उठून गेले भेटायला । मिठी मारली एकामेकाला । काय सांगावा तो सोहळा ॥ चाल ॥ स्वप्न संपलं जागा झाला गांधी महात्मा तो जेव्हां । दारं उघडलीं त्या तुरुंगाचीं बाहेर पडला तो तेव्हां ॥ शक्ति पाशवी थयथय नाचे करिं घेऊन समशेरीला। तोफा बंदुका वायु विषारी बॉंबगोळे बळि घेण्याला॥ सत्य लोपलें, असत्य भरलें, हिंसामय पथ जगताला। आलि शिसारी या मार्गाची चटका बसला हृदयाला॥ आत्मबलानें शक्ति पाशवी आत्मसात् हा करण्याला । गांधी महात्मा शीघ्रगतीनें पहा चालला या काळा । **बलहीनांची एक अहिंसा, भ्याडपणा म्हणती त्याला । प्रबलांची ती दुसरि अहिंसा जिंकुनि येते हिंसेला** ॥ परमेशाच्या पदकमलाला ‘ **पांडुरंग** ’ करि विनतीला । आयुष्याची दोरी भलि दे संत महात्मा गांधीला ॥ ५ ॥

रचना–१५–८–१९४७.